# वसई-विरार शहर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग, मुख्यालय

---

## <u>प्रेसनोट</u>

दि.१७/०५/२०२४

वसई-विरार शहर महानगरपालिकेस सुर्या टप्पा-१ व ३ या योजनेतुन २०० द.ल.ली. प्रतिदिन पाणी उपलब्ध होत असून दि.१५/११/२०२३ पासून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सुर्या ४०३ द.ल.ली. पाणीपुरवठा योजनेतून १०० द.ल.ली. प्रतिदिन पाणी उपलब्ध होत आहे.

MMRDA च्या पाणी पुरवठा योजनेतील कवडास पंपिंग स्टेशन आणि सूर्या नगर जलशुद्धीकरण केंद्र (कासा विक्रमगड) येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी MSEDCL मार्फत विज पुरवठा होत आहे. सदर भागात गुरुवार दि.१६ मे, २०२४ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजता वारा, वादळ, गारपीट झाल्याने सदर ठिकाणी विद्युत तारांवर १६ ठिकाणी झाडे कोलमडून पडली तसेच १ विद्युत खांब व ४ ठिकाणी कंडक्टर नादुरुस्त झाले असल्याने योजनेचा विजपुरवठा पुर्णपणे खंडित झाला आहे.

सदर योजनेचा विद्युत पुरवठा सुरळीत होण्यासाठी अंदाजे पुढील १०-१२ तासांचा कालावधी लागणार असल्याचे MMRDA मार्फत सांगण्यात आले असून या दरम्यान योजनेतून होणारा पाणी पुरवठा पूर्ण पणे बंद राहणार आहे. सदर विजतारांवर पडलेली झाडे काढून विजपुरवठा सुरळीत करण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे.

महापालिकेच्या सूर्या धरणाच्या नवीन आणि जुन्या योजनेतून होणारा पाणी पुरवठा सुरळीत चालू असला तरी MMRDA च्या योजनेतून होणारा पाणी पुरवठा बंद असल्याने वसई-विरार शहरात होणारा पाणी पुरवठा गुरुवार दि. १६/०५/२०२४ रोजी रात्री पासून शुक्रवार दि.१७/०५/२०२४ रोजी पूर्ण दिवस कमी प्रमाणात व कमी दाबाने होणार आहे.

तरी पुढील १ ते २ दिवस महापालिका क्षेत्रास होणारा पाणी पुरवठा हा अपुऱ्या व कमी दाबाने होणार असून नागरीकांनी उपलब्ध पाणी जपुन वापरावे व महापालिकेस सहकार्य करावे हि विनंती.

(गणेश शेटे)
उप आयुक्त (पा.पु.)
वसई-विरार शहर महानगरपालिका